T.16199/24

वाचले :

१. **श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे** पदनाम- **वायरमन** विभाग- **विदयुत मुख्य कार्यालय** यांचा घरबांधणी अग्रिम मिळण्याबाबत दिनांक **२६/०२/२०२४** चा विनंती अर्ज.

२. **श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे** आणि **मे.आयडियल प्रोपर्टीज** यांच्यामधील दि.**०५/०१/२०२४** चा करारनामा.

३. सह शहर अभियंता, विदयुत यांत्रिकी यांचेकडील पत्र क्र.**मुपुर/१/२४/२०२४ दि.०४/०३/२०२४** अन्वये केलेली शिफारस.

४. कार्यकारी अभियंता, स्थापत्य यांचेकडील पत्र क्रमांक- **क्र.स्था/मुख्य/कावि/०४/२५/२०२४, दिनांक ०३/०५/२०२४** चा बांधकाम अहवाल.

५. मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/७४/२०२१, दि.२८/०१/२०२१ अन्वये विभागप्रमुख घोषित करण्यात आले असून प्रशासकीय स्वरुपाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले असून घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार विभागप्रमुख,प्रशासन यांना प्रदान करण्यात आले आहेत.

६. सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५६/२०२२, दिनांक-२०/०१/२०२२

७. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ६३३, दिनांक ३०/०४/२०२१

८. प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक प्रशासन/१५/कावि/१८६/२०२१, दि. ११/०६/२०२१.

९. सामान्य प्रशासन विभागाचा दिनांक :-०६/०६/२०२४ चा मंजूर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८
क्रमांक साप्रवि/१६/कावि/११८/२०२४
दिनांक .-०७/०६/२०२४

विषय : घरबांधणी अग्रिम मंजुरीबाबत.
**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे** पदनाम – **वायरमन**
विभाग – विदयुत मुख्य कार्यालय, संगणक क्र. **१३०५६**

**आदेश,**

**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे** हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर विदयुत मुख्य कार्यालय येथे वायरमन पदावर कामकाज करीत आहेत. त्यांनी दि.**२६/०२/२०२४** च्या अर्जान्वये घरबांधणी अग्रिम मनपा नियमाप्रमाणे मिळण्यासाठी विनंती केली आहे. घरबांधणी अग्रिम मंजुरीस **सह शहर अभियंता, (विदयुत यांत्रिकी)** यांनी पत्र.क्र. **मुंपुर/१/२४/२०२४ दि.०४/०३/२०२४** अन्वये शिफारस केली आहे. तसेच खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसल्याबाबत अहवाल दिला आहे.

**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे ,वायरमन, विदयुत मुख्य कार्यालय** यांची महापालिका आस्थापनेवर एकूण **०३ वर्षे ०० महिने** सेवा पूर्ण झाली असून, शिल्लक सेवा **२८ वर्षे ७ महिने** एवढी आहे.

**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे , वायरमन, विदयुत मुख्य कार्यालय** या मौजे **बो-हाडेवाडी,** येथील **गट नं १३७, १३८, १३९, १३४, १९०,** येथील मिळकतीवर **मे.आयडियल प्रोपर्टीज** यांच्याकडील **"बालाजी विश्व"** या योजनेतील इ विंग मधील **पहिल्या व्या मजल्यावरील** कारपेट ७२४.१४ चौ.फुट चा फ्लॅट क्रमांक १०४ खरेदी करणार आहेत. प्रस्तुत फ्लॅट खरेदीसाठी **श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे** आणि **मे.आयडियल प्रोपर्टीज** यांच्यामध्ये दि.**०५/०१/२०२४** रोजी करारनामा झाला असून, करारनाम्यानुसार प्रस्तुत फ्लॅटची एकूण किंमत र.रु.४४,९८,०००/- इतकी ठरली असून, करारनामा करतेवेळी त्यांनी र.रु. **२५,०००/-** भरली आहे. सदर करारनामा मे. सह दुय्यम निबंधक, हवेली क्र २६ (वर्ग२), पुणे यांचे कार्यालयात दस्तऐवज अ.क्र.**हवल26-443/2024 दि.** 05/01/2024 अन्वये नोंदविण्यात आला आहे.

मौजे **बो-हाडेवाडी येथील गट नं १३७, १३८, १३९, १३४, १९० येथील श्री.विजय बबन हिंगणे व इतर २६ तर्फे म्हणून कु.मु. म्हणुन मे.आयडियल डेव्हलपर्स (भागीदार) म्हणुन बाळकृष्ण महादु सावंत कबुली जबाब नोंदविणार म्हणुन यांचे नावे असल्याचे इंडेक्स टू नोंदीवरुन दिसून येते. अपर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील पत्र क्र.पमह/एनए/एसआर/११४१/२०१४, दि.२९/०७/२०१५ अन्वये सदर मिळकतीस अकृषिक वापरासाठी परवानगी दिली आहे. वकील श्री.श्यामराव श्रावण रामटेके**

यांचेकडील दि. ०७/१०/२०२१ चे सर्च रिपोर्ट अन्वये सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील क्रमांक. बीपी/बो-हाडेवाडी/२१/२०२३,दिनांक-०९/०३/२०२३ अन्वये बांधकामास परवानगी दिली असून, प्रकरणी मंजूर नकाशाप्रत व आवश्यक कागदपत्र सादर केली आहेत .

बॉम्बे फायनान्सीयल रुल्स १९५९ अपेंडीक्स २६ मधील नियम २ (ड) नुसार तयार घर खरेदी करण्यासाठी घरबांधणी अग्रिम देण्याची तरतूद आहे. शासन निर्णय क्रमांक घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनियम मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. ०२ फेब्रुवारी २०२१,अन्वये घरबांधणी अग्रिम मर्यादा वाढविणेत आली आहे. त्यास अनुसरुन मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ६३३, दिनांक ३०/०४/२०२१ अन्वये महानगरपालिका आस्थापनेवरील नियमित वेतनश्रेणीत सलग २ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील हद्दीपासून २० कि. मी. अंतरापर्यंत फ्लॅट/घर खरेदी करणेसाठी मूळ वेतनाच्या १०० पट मिळून येणारी रक्कम परंतु कमाल मर्यादा रक्कम रुपये ७०,००,०००/ विहित मर्यादेपर्यंत घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यास मान्यता दिली आहे. तसे परिपत्रक क्र. प्रशासन/१५/कावि/१८६/२०२१, दि. ११/०६/२०२१ अन्वये सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देणेबाबत संबंधित विभाग प्रमुखांना कळविले आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ५५७, दिनांक २९/०१/१९८५ अन्वये घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान केले आहेत. तसेच तद्नंतर मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/७४/२०२१, दि. २८/०१/२०२१ अन्वये विभागप्रमुख घोषित करण्यात आले असून प्रशासकीय स्वरुपाचे अधिकार प्रदान करण्यात आलेले असून घरबांधणी अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार विभागप्रमुख,प्रशासन यांना प्रदान करण्यात आले आहेत.

**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे ,वायरमन, विदयुत मुख्य कार्यालय** यांचा माहे **जानेवारी-२०२४** च्या वेतनाच्या दाखल्यानुसार मूळवेतन र.रु. **२१,१००/-** इतके आहे. त्यांचा एकुण पगार र.रु **३७,५०३/-**(पेट्रोल **भत्ता र.रु.०० व इतर भत्ते वजा जाता)** इतका आहे. **श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे** यांचे मुळ वेतन वेतनाच्या १०० पट प्रमाणे परतफेडीची क्षमता व पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट १९३६ मधील कलम ७(३)(२) नुसार खालील प्रमाणे एकूण रकमा येतील.

| मुळवेतन | = र.रु. | १०० पट = एकूण |
|---|---|---|
| २१,१००/- | = र.रु. २१,१००/- | १०० पट = २१,१०,०००/- |

| मुळवेतन | = र.रु. | १००% = एकूण |
|---|---|---|
| २१,१००/- | = र.रु. २१,१००/- | १००% = २१,१००/-x १९२ = ४०,५१,२००/- |

| **एकूण पगार / २** | — | **एकूण वजाती** | x | एकूण हप्ते = एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| **३७,५०३**/ २ = १८,७५२/- | - ५,६९१/- = | १३,०६१ | x १९२ | = **२५,०७,७१२/-** |

यापैकी जी रक्कम कमी असेल ती अदा करणे आवश्यक आहे.

**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे ,वायरमन, विदयुत मुख्य कार्यालय** यांची महापालिका आस्थापनेवरील एकूण **०३ वर्षे ०० महिने** सेवा पूर्ण झाली असून, शिल्लक सेवा **२८ वर्षे ७ महिने** सेवा कालावधी शिल्लक आहे व ते खरेदी करीत असलेल्या फ्लॅटची किंमत र.रु. **४४,९८,०००/-** इतकी असल्यामुळे त्यांना महानगरपालिकेने ठरविलेल्या धोरणानुसार,परतफेडीचे क्षमतेनुसार , पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टनुसार , शिल्लक सेवेनुसार पुर्णांकीत र.रु. **२१,१०,०००/-** (पुर्णांकित) इतके घरबांधणी अग्रिम मंजूर करता येईल.

**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे ,वायरमन, विदयुत मुख्य कार्यालय** यांना र.रु. **२१,१०,०००/-** **(र.रु.एकवीस लाख दहा हजार फक्त)** घरबांधणी अग्रिम मंजूर केल्यास त्यांच्याकडून घरबांधणी अग्रिमाची वसुली दरमहा र.रु. **१०,९००/-** प्रमाणे **१ ते १९१** हप्ते तसेच **१९२** वा हफ्ता र.रु.**२८,१००/-** प्रमाणे करण्यात येईल व तद्नंतर संपूर्ण घरबांधणी अग्रिम रकमेवरील व्याजाची वसुली **४८** हप्त्यात करावी लागेल.

**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे ,वायरमन, विदयुत मुख्य कार्यालय** खरेदी करीत असलेला फ्लॅटचे बांधकाम **९०%** पूर्ण झाले असून, करारनाम्यानुसार बांधकाम खर्च रक्कम रुपये **४०,४८,२००/-** इतका अदा करण्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी पत्र क्रमांक **क्र.स्था/मुख्य/कावि/०४/२५/२०२४, दिनांक ०३/०५/२०२४** अन्वये अहवाल दिला आहे. तथापि बांधकाम पूर्णत्वाचा दाखला सादर न केल्याने **श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे** यांना मंजूर घरबांधणी अग्रिम रक्कम रु. **२१,१०,०००/-** च्या **९०** टक्के र.रु.**१८,९९,०००/-** एवढी येते.

**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे ,वायरमन, विदयुत मुख्य कार्यालय** आणि **मे.आयडियल प्रोपर्टीज** यांच्यामधील दि.**०५/०१/२०२४** चा करारनामा, तसेच अनुषंगिक कागदपत्रे, संबंधित विभागप्रमुख यांची

शिफारस व कार्यकारी अभियंता, स्थापत्य यांचा अहवाल या बाबी विचारात घेता, **श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे** यांना र.रु. **२१,१०,०००/-(र.रु.एकवीस लाख दहा हजार फक्त** ) घरबांधणी अग्रिम मंजूर करुन, घरबांधणी अग्रिमाचा **पहिला हप्ता** पुर्णांकित **र.रु. १८,९९,०००/- (अक्षरी र.रु. अठरा लाख नव्यानोव हजार फक्त)** अदा करण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :**

१. घरबांधणी अग्रिम रक्कम घेणेपूर्वी फॉर्म नं. ए-२ मध्ये करारनामा व विहित नमुन्यातील कुलमुखत्यारपत्र करुन द्यावे. तसेच **नोंदणीकृत इक्विटेबल मॉर्गेज** ( नोटीस ऑफ इंटीमेशन रिगार्डींग मॉर्गेज बाय डिपॉझिट ऑफ टायटल डीड) करुन द्यावे. घरबांधणी अग्रिम रकमेची भरणा पावती त्वरीत सादर करावी. तसेच खरेदी केलेल्या मिळकतीचा विमा उतरविणेत यावा.

२. **श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे , वायरमन, विदयुत मुख्य कार्यालय** यांच्याकडून घरबांधणी अग्रिम रकमेची वसूली दरमहा **१०,९००/-** प्रमाणे **१ ते १९१** हप्ते तसेच **१९२** वा हफ्ता र.रु.**२८,१००/-** प्रमाणे करण्यात येईल व तद्नंतर संपूर्ण घरबांधणी अग्रिम रकमेवरील व्याजाची वसुली **४८** हप्त्यात करावी लागेल.

३. घरबांधणी अग्रिम मंजुरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रिमाची वसुली पुर्ण झाल्यानंतर या दोन्ही बाबीची नोंद सक्षम प्राधिका-याच्या प्रमाणपत्राच्या आधारे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

४. घरबांधणी अग्रिम रकमेच्या नियमित व योग्य वसूलीसाठी अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

५. अग्रिमधारक अनधिकृत रजेवर राहिल्यास अथवा इतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला,अन्य विभाग/कार्यालयात बदली झाली तरीही घरबांधणी अग्रिम तसेच मनपाकडील इतर अन्य अग्रिमाची नियमित परतफेड करण्यास संबंधित अग्रिमधारक स्वत जबाबदार राहील.

६. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक घबांअ-२०१९/प्र.क्र.१४/२०१९/विनियम मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. ०२ फेब्रुवारी २०२१ नुसार अग्रिमाची रक्कम रु.**२५** लाखापेक्षा कमी असल्याने व्याजाची परिगणना एकरुप दराने **७.९** टक्के याप्रमाणे करण्यात यावी. मात्र शासन तसेच महानगरपालिका धोरणानुसार वेळोवेळी होणारे बदल बंधनकारक राहतील.

७. घरबांधणी अग्रिम ज्या प्रयोजनाकरीता मंजूर केले आहे.त्या कारणाकरीता त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यास कोणत्याही प्रकारची कसूर झाल्यास कसूरदाराकडून अग्रिमाची रक्कम,प्रचलित व्याजदर + २.७५ टक्के दंडनीय व्याजासह एकरकमी वसूल करण्यात येईल.

८. घरबांधणी अग्रिम रकमेची वसूली उक्त अट क्र.२ मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे अग्रिमाची रक्कम अदा केलेनंतर **माहे जुलै २०२४** पासून दरमहा नियमित करण्यात येईल.

९. खरेदी केलेल्या घराचा स्वतः राहणेसाठी वापर करावा, भाडयाने अथवा इतरांना वापरणेस देण्यात येऊ नये. अन्यथा आपणाकडून दंडात्मक व्याजासह संपूर्ण रकमेची वसुली करणेत येईल व फ्लॅट महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल.

१०. सदर रक्कम **मे.आयडियल प्रोपर्टीज** यांचे नावे **ECS** ने जमा करण्यात यावी.

**सही/-**
**(किरणकुमार मोरे)**
सहा. आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

प्रति,
**श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे** पदनाम - **वायरमन**
विभाग – **विदयुत मुख्य कार्यालय**

प्रत
१) लेखा विभाग
२) संबंधित विभाग – **विदयुत मुख्य कार्यालय**

२/- प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद संबंधिताचे सेवानोंद पुस्तकात घेऊन देयक लेखा शाखेस सादर करणेसाठी अग्रेषीत.

३)सहा.मंडलाधिकारी **-मोशी** करसंकलन कार्यालय

२/- प्रस्तुत फ्लॅटची करआकारणी **श्री.प्रविण दत्तात्रय पिंगळे ,वायरमन, विदयुत मुख्य कार्यालय** याचे नावे होताच महानगरपालिका करआकारणी रजिस्टरला घर अग्रिम र.रु. **२१,१०,०००/- (र.रु.एकवीस लाख दहा हजार फक्त** ) च्या कर्जबोजाची नोंद घेणेत यावी व तसा पूर्तता अहवाल प्रशासनास तातडीने सादर करणेत यावा.

४) साप्रवि , संगणक कक्ष

(गोरखनाथ लिमण)
प्रशासन अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी.४११०१८